# कृषि उत्पन्न बाजार समिती, मांढळ ता. कुही जि. नागपूर

## ●सन २०२४-२५ वर्षाचा संक्षिप्त अहवाल●

| | | |
|---|---|---|
| समिती नोंदणी क्रमांक | : ए.पी.एम.२०७३/१३७२६/(III) दि. १८/०७/१९७३ | |
| समितीची स्थापना | : दि. १२/१२/१९७२ | |
| समिती नोटीफीकेशन | : ३८२ दि. ०१/०२/१९७३ | |
| प्रत्यक्ष कामकाज सुरूवात | : दि. १७/०७/१९७४ पासुन | |
| समितीचे कार्यक्षेत्र | : पुर्ण कुही तालुका, १८५ गावे | |
| कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायती | : ५८ | |
| कार्यक्षेत्रातील नगरपंचायत | : ०१ | |
| कार्यक्षेत्रातील सेवा सहकारी संस्था | : ४६ | |
| संस्थेकडे असलेली जमीन | मांढळ | : ४.८५ एकर |
| | कुही | : १०.०० एकर |
| | वेलतूर | : २.७२ एकर |
| | एकुण | : १७.५७ एकर |

- **नियमन केलेले शेतमाल**

समितीने कापूस (सरकी काढलेला व न काढलेला), ओली व वाळली मिरची, गहू, ज्वारी, धान(भात), सोयाबिन, तूर, चना, तिळ, अंबाडी, पोपट, सुर्यफुल, मुंग, उळीद, लाख, धना, गवत व गुरांचे वैरन, गुरेढोरे तसेच शेळया-मेंढया इत्यादींचे नियमन केलेले असुन सदर मालाचे खरेदीवर खरेदी दाराकडून शेकडा १.०० रुपया बाजार फी व ०.०५ पैसे शासकिय देखरेख फी वसुल करीत असते व कापूस या शेतमालावर बाजार फी व देखरेख फी एकुण ०.८० पैसे व्यापाऱ्याकडून वसुल केली जाते.

- **बाजार समितीमध्ये असलेल्या सुविधा**

➢ **मुख्य बाजार आवार मांढळ (४.८५ एकर)**

समितीचे मुख्य बाजार आवारामध्ये ऑफीस इमारत, चेक पोस्ट, सिमेंटची वॉल कंपाउड, विहीर, बोरवेल, शेतकऱ्यांना पाणी पिण्यासाठी थंड पाण्याची सोय (फ्रीजर), संपुर्ण इलेक्ट्रानीक वजनकाटे, भुईकाटा (धरम) काटा ५० मे. टन क्षमतेचा, ५ लिलाव शेड, गुरांना पाणी पिण्यासाठी टाका, विद्युत व्यवस्था, गोदाम २०० मे. टन क्षमतेचे, टिकर बोर्ड, तक्रार पेटी, संडास, फ्लोअरींग, जनरेटर इत्यादी सुविधा केलेली आहे. तसेच समितीचे मांढळ येथील बाजार आवारात १००० मे.टन क्षमतेचे गोदाम बांधकाम पुर्ण झालेले असुन. शेतकऱ्यांचा व व्यापाऱ्याचा शेतमाल भाडे तत्वावर ठेवण्यात येत आहे.

> **उपबाजार कुही (१०.०० एकर)**

समितीचे उपबाजार म्हणुन कुही येथे दि. १९/०५/२००५ रोजी घोषीत केलेले असुन समितीने २०० मे. टन क्षमतेचे १ गोदाम, रस्ता तसेच शासनाचे माध्यमातून विहीर, अंतर्गत रस्ता, स्वच्छता गृह व मुतारी इत्यादी बांधकाम केलेले आहे. तसेच समितीचे आवाराला दोन बाजुने तारांचे कंपाऊंड केले असुन दोन बाजु बाकी आहेत. मागील चार वर्षापासुन समितीने उपबाजार कुही येथे कापुस बाजार व धान्य बाजार सुरू केलेला असुन शेतकऱ्यांचे सध्या भरपूर प्रमाणात सहकार्य मिळत आहे. समितीकडे स्वनिधी नसल्यामूळे सुविधा करण्यास अडचन जात आहे. तरीही समितीने सन २०१७-१८ या वर्षात ५० मे.टन क्षमतेचा भुईकाटा बांधकाम केलेले असुन सदर काटयावर मोजमाप सुरू आहे.समितीने ९x१२ मिटर आकाराचे लिलाव ओटा व त्यावर शेड बांधकाम पूर्णत्वास येत आहे. तसेच या चालू वर्षात एक ४०x२२.५० मिटर आकाराचे. खाली जागेवर फ्लोअरींगचे बांधकाम करण्याचा समितीचा मानस असुन मंजुरी प्रक्रिया सुरुआहे.

> **बाजार भाव माहिती**

दररोज शेतमालाचे बाजारभाव  संगणकाद्वारे पणन मंडळास पाठविले जातात. तसेच समितीचे भाव फलकावर लिहून प्रसिध्द केले जातात.

> **जनावराचा बाजार**

समितीचे मुख्य बाजार आवार मांढळ येथे दर मंगळवारला गुरांचा बाजार भरविला जातो. बाजार समितीने (गुरांचा बाजार) वार्षीक ठेक्याने दिलेला होता. यापासुन समितीला बाजारापोटी रुपये २,३१,०००/- उत्पन्न प्राप्त झालेला आहे.

- **निवडणुक**

समितीचे संचालक मंडळाची निवडणुक होवून नविन संचालक मंडळ दि. २५/०५/२०२३ पासुन कार्यरत असुन, सभापती पदावर मा. श्री. मनोज तितरमारे व उपसभापती पदावर मा. श्री. महादेव जिभकाटे यांची निवड झालेली आहे. व समितीचा कार्यभार सभापती , उपसभापती व संचालक मंडळ सांभाळीत आहेत.

- **कर्ज व परतफेड**

समितीने मुख्य बाजार विकासासाठी म.रा.कृ.प.मं.पुणे कडून फ्लोअरींग व दोन ओपन ओटयावर स्लॅबचे काम करण्यासाठी २७ लाख रुपये कर्ज घेतलेले होते.या कर्जाची पुर्णपने परतफेड केलेली आहे. तसेच नविन गोदाम बांधकामासाठी ४७.६० लक्ष रुपये कर्ज घेतलेले असुन कर्जाची परतफेड  नियमीत सुरु आहे.

- **धान्य चाळणी यंत्र**

समितीमध्ये शेतकऱ्यांचा सोयाबिन, चना, गहू व इतर शेतमाल साफ करण्यासाठी धान्य चाळणी उपलब्ध आहे. शेतकऱ्यांकडून कोणतेही आकार न घेता चाळणी यंत्र पूरविले जाते. मात्र तीचा उपयोग बाजारात शेतमाल आनुन साफ करता येईल.

- **शेतमाल तारण कर्ज योजना**

समितीचे मार्केट यार्ड वर मांढळ व कुही येथे प्रत्येकी १ याप्रमाणे २०० मे. टन क्षमतेचे गोदाम आहे. मौजा मांढळ येथील गोदाम भाडयाने दिलेला आहे व कुही येथील गोदाम माल ठेवने योग्य नाही. परंतू नविन गोदामाचे बांधकाम प्रक्रिया पूर्ण झालेली असुन चालू वर्षात शेतमाल तारण कर्ज योजना राबविता येईल.

- **संगणकीकरण**

समितीने दोन संगणकाची उभारणी केली असुन सध्या बाजारभाव पाठविणे सुरू आहे. तसेच वार्षीक अहवाल, अर्थसंकल्प व इतर महत्वाचे पत्र व्यवहार ऑनलाईन पाठविणे सुरू आहे. तसेच टॅली अकाउंट पध्दतीने अकाउंट काम दि. १/४/२०१३ पासुन सुरू असुन नियमित टॅली अकाउंट पध्दतीने काम केले जाते.

- **भुईकाटे**

समितीचे मुख्य बाजार आवार मांढळ व उपबाजार कुही येथे प्रत्येकी ५० मे. टन क्षमतेचे भुईकाटे बसविले असुन वापरात सुरू आहे. तसेच शेतकऱ्यांचा संपुर्ण शेतमाल विक्री झाल्यानंतर अडत्यांचे इलेक्ट्रीक वजन काटयावर शेतकऱ्यासमोर मोजमाप केले जाते.

- **अनुज्ञप्तिधारकाची माहिती**

| **अनुज्ञप्ति प्रकार** | **सन २०२४-२०२५** |
|---|---|
| अडत्ये | ६४ |
| अ वर्ग व्यापारी | २७ |
| अ वर्ग प्रक्रिया | ३ |
| बैलदलाल | १४ |
| मापाडी | १८ |
| हमाल | ४१ |
| मदतनिस | ० |
| स्वस्त धान्य दुकानदार | ० |

- **बाजार आकार (मार्केट फी)**

| | |
|---|---|
| बाजार फी धान्य | प्रति शेकडा १.०० व्यापारी कडून |
| देखरेख फी धान्य | प्रति शेकडा ०.०५ व्यापारी कडून |
| बाजार फी कापूस | प्रति शेकडा ०.५० व्यापारी कडून |
| देखरेख फी कापूस | प्रति शेकडा ०.०५ व्यापारी कडून |
| अडत | प्रति शेकडा २.०० व्यापारी कडून |
| हमाली तोलाई धान्य | प्रति क्विंटल १०.०० शेतकऱ्याकडून |
| ओली मिरची हमाली तोलाई | प्रति क्विंटल २.०० शेतकऱ्याकडून |
| वाळली मिरची हमाली तोलाई उतराई | प्रति बोरा १०.०० शेतकऱ्याकडून |
| कापुस हमाली तोलाई | प्रति क्विंटल १०.०० शेतकऱ्याकडून |
| जनावर प्रवेश फी | मोठी जनावरे ५.०० शेतकऱ्याकडून |
| | लहान जनावरे ३.०० शेतकऱ्याकडून |

- **अनुज्ञप्ति फी दर**

| अनुज्ञप्ति प्रकार | अनुज्ञप्ति फी दर | नुतनीकरण दर |
|---|---|---|
| अडत्ये | २०० | १८० |
| अ वर्ग व्यापारी | २०० | १८० |
| ब वर्ग व्यापारी | १०० | ९० |
| अ वर्ग प्रक्रिया | २०० | १८० |
| ब वर्ग प्रकिया | १०० | ९० |
| बैलदलाल | ८० | ७२ |
| मापाडी | २० | १८ |
| हमाल | १० | ९ |
| मदतनिस | १० | ९ |
| स्वस्त धान्य दुकानदार | १०० | ९० |

- **कर्मचारी वर्ग स्थाई व रोजंदारी**

१) श्री. प्रल्हाद रामदास पराते, लेखापाल
२) श्री. नरेश मानिकराव कडव, निरिक्षक
३) श्री. सोमेश्वर आत्मारामजी लुटे, क.लिपीक
४) श्री. पोपेश्वर नामदेव शेबे, क. लिपीक
५) श्री. शांताराम येळुजी पंधरे, पहारेकरी

१) श्री. दशरथ विष्णू चौधरी (रो.कर्म.)
२) श्री. अक्षय अशोक रामटेके (रो.कर्म.)
३) श्री. विष्णु रामकृष्ण मेहरकुडे (रो.कर्म.)
४) श्री. लोकेश तानबा नखाते (रो.कर्म.)
५) श्री. आकाश प्रेमदास शेंडे (रो.कर्म.)
६) श्री. प्रकाश कृष्णाजी तिजारे (रो.कर्म.)

## मागील पाच वर्षातील उत्पन्न - खर्च - वाढवा - तुट बाबत माहिती

| वर्ष | उत्पन्न (रु.) | खर्च (रु.) | वाढवा (रु.) | तुट (रु.) |
|---|---|---|---|---|
| २०२०-२०२१ | ७४६५७१५ /- | ६७५८५९८ /- | ७०७११७ /- | -- |
| २०२१-२०२२ | ६९०१२३२ /- | ६५०४७३२ /- | ३९६४९९ /- | -- |
| २०२२-२०२३ | १००२७८८९ /- | ८०५१२५६ /- | १९७६७३३ /- | -- |
| २०२३-२०२४ | ११३३८५५३/- | ८८७४३९१/- | २४६४१६२/- | -- |
| २०२४-२०२५ | १२५३३७४८/- | ९७११४४४/- | २८२२३०४/- | -- |

समितीचे कार्यक्षेत्रातील १८५ गावापैकी ३३ गावे गोसेखुर्द (इंदीरा सादर) प्रकल्पाचे बुडीत क्षेत्रात गेलेली असुन त्या ३३ गावाचे याच तालुक्यात पुनर्वसन झालेले आहे. त्यामूळे उत्पादीत क्षेत्र कमी होवून उत्पादन कमी होत आहे. मागील दोन-तीन वर्षापासुन कापूस या शेतमालाची लागवड होत असुन समितीचे कार्यक्षेत्रात जिनिंग तयार झाल्यामूळे उत्पन्नात वाढ झालेली दिसत आहे .

- **लेखापरिक्षण**

समितीचे कामकाजाचे शासकिय लेखापरिक्षका कडून सन २०२३-२०२४ चे लेखापरिक्षण झालेले असुन लेखापरिक्षण अहवाल समितीला प्राप्त झालेला असुन व दोष दुरूस्ती अहवाल दि.३०/०८/२०२५ रोजी सादर करण्यात आलेले आहे.

- **स्वच्छता अभियान**

समितीने समितीचे कार्यालयात स्वच्छता अभियान कार्यक्रम राबविलेला असुन मार्केट यार्डची साफसफाई नियमित केली जाते.

- **शेतमाल आवक**

| सन | आवक | किंमत |
|---|---|---|
| २०२०-२०२१ | ११२०८६.५२ | ५१८६९७७०४ /- |
| २०२१-२०२२ | ७९१३७.६६ | ४८४७४४०१६ /- |
| २०२२-२०२३ | १३६९२८.५४ | ९२३६२०१५२ /- |
| २०२३-२०२४ | २८९६२८.७३ | १९०७५१३३९३/- |
| २०२४-२०२५ | २९८३१९.२६ | १९१२७२९८०२/- |

- **शासकिय आधारभुत खरेदी केंद्र**

समितीचे कार्यक्षेत्रात शासकिय आधारभुत खरेदी केंद्र कुही व बोथली (वेलतूर) येथे उपलब्ध असुन धान व चना या शेतमालाची शासकिय आधारभुत किंमतीने खरेदी केली जाते. सन २०२४-२५ या वर्षात ३२७५९.५९ क्विंटल धान खरेदी झालेली आहे.

## सन २०२४-२०२५ चा शेतमाल आवक तक्ता

| शेतमालाचे प्रकार | आवक (क्विं.) | किंमत |
|---|---|---|
| चना | १७२९३.८९ | ९५१४९१४३/- |
| सोयाबिन | २५००९.३० | ९३८१७२५७/- |
| धान | १८३८२.४१ | ४८२९२४७०/- |
| लाखोरी | ४१५.०७ | १५७२६४२/- |
| तूर | १०१३.६१ | ७४२१२५८/- |
| गहू | २१९.३७ | ५३७२१३/- |
| धना | ३६.०७ | २००९७६/- |
| मुंग | ५७.४१ | ३५६३५५/- |
| उडीद | २.०३ | १५१४५/- |
| मोवरी | १.३५ | ५९०४/- |
| ओली मिरची | ९०५.०४ | २३४१७६७/- |
| वाळली मिरची | १२७३४.९८ | ११०६८४०८३/- |
| कापूस | २२२२३९.८५ | १५५२३०३७५७/- |
| जवस | १.४१ | ७१४१/- |
| वटाना | ७.४७ | २४६९१/- |
| **एकुण** | **२९८३१९.२६** | **१९१२७२९८०२/-** |

याप्रमाणे समितीचा सन २०२४-२५ वर्षाचा संक्षिप्त अहवाल आपणाकडे सादर करण्यात येत आहे. हि विनंती. धन्यवाद.

**मनोज अं. तितरमारे**
**सभापती**

**महादेव वि. जिभकाटे**
**उपसभापती**

**अंकुश न. झंझाळ**
**सचिव**

**कृषि उत्पन्न बाजार समिती, मांढळ**
**ता. कुही जि. नागपूर**